# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet :http/www.dte.org.in


**तात्काळ**

क्र.१०/एडीएम/टयुफीव्हेस्की/२०१०/४८६
दि. 5 AUG 2010

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये पदविका अभ्यासक्रमातील टयुशन फी व्हेअर स्कीम अंतर्गत प्रवेश घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या फीबाबत...

**संदर्भः-** शासन निर्णय पीपीएन २००९।(३२/१०)/टीई-५, उच्च व तंत्रशिक्षण विभाग दि. ०५/०६/२०१०.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये पदविका अभ्यासक्रमातील टयुशन फी व्हेअर स्कीम अंतर्गत प्रवेश घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांकडुन दुप्पट फी घेण्यात येत होती. तथापि, उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१०-११ मधील प्रवेश नियमवलीमध्ये सदर अट वगळण्यात आलेली आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासुन पदविका अभ्यासक्रमातील टयुशन फी व्हेअर स्कीम अंतर्गत जादा प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांकडुन दुप्पट फी न घेता एकेरी फी घेण्यात यावी. तसेच दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांकडुन ही एकेरी फी घेण्यात यावी.

तरी, याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थाच्या निदर्शनास सदर बाब आणून देण्यांत यावी.

(डॉ. सु.का.महाजन)
प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य

प्रतः- कार्यासन क्र. ३, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना, निवड नस्ती.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet :http/www.dte.org.in


**तात्काळ**

क्र.१०/एडीएम/थेद्वि/२०१०/ ४७७
दि. 5 AUG 2010

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

**विषय : थेट व्दितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेची अंतीम दिनांकाबाबत..**

**संदर्भः-** या कार्यालयाची दि. ०३/०८/२०१० रोजीची टिप्पणी

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, थेट व्दितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाची प्रवेशाची अंतीम दिनांक १६/०८/२०१० ठेवण्यात आलेली आहे.

तरी, याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थाच्या निदर्शनास सदर बाब आणून देण्यांत यावी.

(डॉ. सु.का.महाजन)
प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य

प्रतः- कार्यासन क्र. ३, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना, निवड नस्ती.